# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रसेनोट क्र- ११२-२३** **दिनांक ०६/०४/२०२३**

## टेम्पो चे लॉक तोडुन चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन २१,५९,३४४/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत - काशिमिरा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

-------OOOO---------

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत राहाणारे तक्रारदार श्री. अनिकेत नवनाथ पवार, वय २५ वर्ष, व्यवसाय-ट्रान्सपोर्ट, रा. रुम नं ७०४, ए विंग, अंतरीक्ष बिल्डींग, को हौ.सो. मिरारोड पोलीस ठाणेच्या समोर, बेवर्ली पार्क, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे. यांनी दिनांक ३०/०३/२०२३ रोजी रात्रौ. ०२:३० वाजेच्या सुमारास त्यांच्या टाटा एस टेंम्पो मध्ये भिवंडी येथील गोडावुन मधुन महागडे मोबाईल तसेच ईलेक्ट्रॉनिक ॲसेसरीज असा एकुण २१,९१,७०२ /- रुपये किंमतीचा माल भरुन भाईंदर पश्चिम येथिल क्रोमा स्टोर्स मध्ये डिलेवरी करण्यासाठी पेणकरपाडा, काशिमीरा येथे आणुन टेंम्पो पार्क करुन ठेवला असता सदरचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने टेंम्पोचा लॉक तोडुन त्यातील महागडे मोबाईल तसेच ईलेक्ट्रॉनिक ॲसेसरीज असा एकुण २१,९१,७०२ /- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी केलेबाबत तक्रार दिल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत दिनांक ०१/०४/२०२३ रोजी गुन्हा रजि. नं. २४०/२०२३ कलम ४६१,३७९ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्याचे व.पो.नि.श्री संदीप कदम यांनी आदेश व मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. श्री. प्रशांत गांगुर्डे व पथकाने नमुद घटनास्थळावर मिळुन आलेले जवळपास ५०० हुन अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रिक विश्लेषनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे विशाल रमेश राजभर यास सिवील हॉस्पीटल परिसर, वलसाड राज्य गुजरात येथे सापळा कारवाई करुन शिताफिने ताब्यात घेतले. वर नमुद आरोपीताने सदर गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे अरोपीत आकाश सुशील मंडल, रा. पेणकरपाडा, मिरारोड यांचेसह केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद अटक आरोपीताचे ताब्यातुन गुन्हयात चोरी केलेल्या मालमत्तेपैकी २१,५९,३४४/- रुपये किंमतीचे मोबाइल तसेच इलेक्ट्रॉनिक ॲसेसरीज असा मुदेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. अटक आरोपीत हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरोधात मुंबई, ठाणे, वलसाड, राज्य गुजरात येथे घर फोडीचे व बतावणीचे १० हुन अधिक गुन्हे नोंद आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. संदीप कदम, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. श्री. प्रशांत गांगुर्डे, पो.उप.नि. श्री. प्रकाश कावरे, स.फौ. अनिल पवार, पो.हवा. सचिन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पो.अंम. रविंद्र कांबळे, प्रविण टोबरे सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे व पो.हवा. जयप्रकाश जाधव नेम. पो.उप.आ. कार्यालय, परिमंडळ १ यांनी केलेली आहे.


पारपत्र पडताळणी
PASSPORT VERIFICATION
TRIPOD
PHILIPS
PHILIPS
PHILIPS
13in1

-----oooo-----